# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २५४ वा शुक्रवार दि.०४ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लातूर जिल्हा क्रीडा संकुलाचा सर्वंकष विकास आराखडा तयार करून अंमलबजावणी करावी

### क्रीडामंत्री ना. दत्ताजी भरणे व माजी मंत्री आमदार अमित देशमुख व संबंधित अधिकारी यांची मंत्रालयात व्यापक बैठक

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र आणि संपूर्ण देशातील शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपाला आलेल्या लातूरमध्ये विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या तरुण वर्गाला क्रीडा क्षेत्रात करिअर घडवता यावे, त्यासाठी त्यांना सराव करता यावा म्हणून येथील जिल्हा क्रीडा संकुलाचा सर्वंकष पुनर्विकास आराखाडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. पुरेशी जागा उपलब्ध करून विभागीय संकुलाच्या उभारणीलाही गती द्यावी आदी मागण्या माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवारी दुपारी क्रीडामंत्री मा.श्री.दत्ताजी भरणे यांच्या समवेत मंत्रालयातील त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीदरम्यान केल्या आहेत. सर्व मागण्यांच्या संदर्भाने सकारात्मक प्रतिसाद देऊन त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना क्रीडा मंत्रीमहोदयांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. लातूर जिल्हा क्रीडा संकुलातील विविध क्रीडा मैदानांची दुरुस्ती व इतर सुविधाची उपलब्धता तसेच लातूर येथे मंजूर असलेल्या विभागीय क्रीडा संकुल उभारणी संदर्भात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांचा संदर्भात बुधवार दि. २ एप्रिल २५ रोजी क्रीडामंत्री मा.श्री.दत्ताजी भरणे यांनी मंत्रालयात आमदार अमित देशमुख यांच्या उपस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेतली. लातूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाचा ऑलम्पिक क्रीडा संकुलाच्या धर्तीवर पुनर्विकास करण्यात यावा, जिल्हा क्रीडा संकुलात खेळाडूसाठी अनेक क्रीडांगणे व सोयी सुविधा उभारण्यात आल्या आहेत, यातील स्केटिंग रिंग, लॉन टेनिस, खो खो मैदान याचे नूतनीकरण आवश्यक असून, बास्केटबॉलसाठी डोम व हॉलीबॉल, टेबल टेनिस, जिम्नॅस्टिक, कुस्ती, बॉक्सिंग तलवारबाजी, कबड्डी हे खेळ इनडोअर घेण्यासाठी एक स्वतंत्र इमारत उभारून त्यात वेगवेगळे अद्यावत हॉल निर्माण करणे आवश्यक आहे. या क्रीडा संकुलातील प्रेक्षक गॅलरीची दुरुस्ती करून त्यावर सोलर सिस्टिमचे कव्हर निर्माण करावे जेणेकरून येथे लागणारी वीज तेथेच निर्माण होईल खेळाडूंना सर्व प्रकारच्या खेळांच्या नियमांची माहिती मिळणे, नामवंत खेळाडूंच्या कौशल्यांची व त्यांच्या कारकिर्दीची माहिती मिळण्याच्या दृष्टीने या क्रीडा संकुलावर स्पोर्ट लायब्ररी आणि ई लायब्ररीची सुविधा निर्माण करण्यात यावी, लातूर जिल्हा क्रीडा संकुलावर सकाळी व संध्याकाळी फिरण्यासाठी येणारे नागरिक आणि खेळाडूंची संख्या मोठी आहे, प्रवेशद्वारात या सर्वांची वाहने उभी राहत असल्याने या परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होते, ही बाब लक्षात घेता त्यांच्या वाहनासाठी स्वतंत्र वाहन तळ आवश्यक आहे. या सुविधेसाठी लगत असलेल्या आयटीआयची जागा उपलब्ध करून घ्यावी. लातूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलात नागरिकांना फिरण्यासाठी एकूण तीन ट्रॅक बांधण्यात आले आहेत, यातील दोन ट्रॅक फेवर ब्लॉकचे आहेत, या ट्रॅकवर चालल्यामुळे नागरिकांना व खेळाडूंना गुडघेदुखीचा त्रास उद्भवत आहे, ही बाब लक्षात घेता या ठिकाणी एक सिंथेटिक ट्रॅक बनवण्यात यावा. लातूर क्रीडा संकुलावर नियमितपणे तालुका, जिल्हा आणि विभागीय पातळीवरच्या क्रिडा स्पर्धा होत असतात, या स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक यांच्या निवासासाठी बांधण्यात आलेले वस्तीगृह आता जीर्ण झाले आहे. त्यामुळे त्याठिकाणी बीओटी तत्त्वावर अद्यावत वस्तीगृह, प्रशिक्षक अधिकाऱ्यांसाठी विश्रामगृह आणि या सर्वांसाठी कॅन्टींगची उभारणी करण्यात यावी. क्रिकेट खेळाकडे तरुणांचा असलेला ओढा लक्षात घेऊन कव्हा येते क्रीडा संकुलासाठी उपलब्ध असलेल्या जागेवर अद्यावत क्रिकेट मैदान उभारण्यात यावे, क्रिकेट अकादमी स्थापन करून त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे पीचेस, लॉन, प्रेक्षक गॅलरी वस्तीगृह यासह विविध सोयी सुविधा उभारण्यात याव्यात लातूर येथे मंजूर असलेल्या विभागीय क्रीडा संकुलात सर्व प्रकारातील आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा मैदाने व सोयी सुविधा उभारण्यासाठी



मुरुड अकोला येथील वन विभागाची जमीन उपलब्ध करून घ्यावी. या व इतर मागण्या तसेच सूचना या बैठकीदरम्यान नोंदवण्यात आल्या. सर्व मागण्या आणि सूचनावर बैठकीदरम्यान संबंधित अधिकारी यांच्यासमवेत विचारविनिमय करण्यात आला, लातूर क्रीडा संकुलाच्या संदर्भाने आलेल्या सर्व प्रस्तावावर चर्चाही झाली, तयार असलेल्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी नव्याने आलेल्या सूचनांचे प्रस्ताव तयार करून ते तातडीने मंजूर करून घ्यावेत त्याच्यावर अंमलबजावणी करावी अशा सूचना क्रीडामंत्री दत्ताजी भरणे यांनी याववेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. लातूर येथील क्रीडा क्षेत्राचा विकास करण्यासाठी नोंदविण्यात आलेल्या विविध मागण्यावर एकत्रित स्वतंत्र बैठक बोलावून सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल क्रीडामंत्री दत्ताजी भरणे यांचे यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आभार मानले.

## ट्रम्प टॅरिफवर तुम्ही आता काय करणार? ; लोकसभेत राहुल गांधींचा सरकारला थेट सवाल, चीनवरूनही घेरले

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या सवलतीच्या परस्पर शुल्कावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी संसदेत प्रतिक्रिया दिली. यावेळी राहुल गांधींनी ट्रम्प टॅरिफवर तुम्ही आता काय करणार ? असा सरकारला थेट सवाल केला . त्यासोबतच त्यांनी चीनच्या मुद्द्यावरून सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला.

टॅरिफबाबत नेमके काय करणार आहे? राहुल गांधी यांनी सरकारला,अमेरिकेने भारतावर शुल्क लादले आहे, ज्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल.

सरकारने आता हे सांगावे की ते टॅरिफबाबत नेमके काय करणार आहे? असा सवाल केला. पुढे ते म्हणाले की,आमच्या मित्र राष्ट्रांनी अचानक आमच्यावर २७ टक्के कर लादण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे आमची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होणार आहे. आपले ऑटोमोबाईल आणि औषध उद्योग संकटात आहेत. असे त्यांनी म्हटले. राहुल गांधी चीनबद्दल काय म्हणाले? लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी केवळ ट्रम्पच्या शुल्कावरच नव्हे तर चीन वादावरही आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की,चीनने आपली जमीन बळकावली आहे. आपल्याला देशाची व्यापलेली जमीन परत मिळाली पाहिजे. सीमेवर पूर्वीसारखीच स्थिती असली पाहिजे. सरकारवर प्रश्न उपस्थित करताना राहुल म्हणाले की, तुम्ही ४४००० चौरस किलोमीटर जमीन चीनला दिली आहे. राहुल म्हणाले की, कोणीतरी एकदा इंदिरा गांधींना विचारले होते की परराष्ट्र धोरणात त्या डाव्या बाजूकडे झुकतील की उजव्या बाजूकडे, परंतु भाजप-आरएसएसने थेट उजव्या बाजूकडे झुकले आहे. असे त्यांनी म्हटले.

# मॉन्सून काळातील आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज राहावे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर :- मॉन्सून काळात पूर, अतिवृष्टी, चक्रीवादळ यासारख्या आपत्तींची शक्यता असते. त्यामुळे अशा कोणत्याही आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सज्ज राहण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात बुधवारी झालेल्या मॉन्सूनपूर्व तयारी बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री. जाधव यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर पाटबंधारे विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. कोणतीही आपत्ती अचानक येते, त्यामुळे सर्व यंत्रणांनी अशा आपत्तींचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे. लातूर पाटबंधारे विभाग आणि जिल्हा परिषदेच्या सिंचन तलाव, पाझर तलाव आदी प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना




तातडीने कराव्यात. यासोबतच आपत्कालीन परिस्थितीत काय करावे किंवा काय करू नये, याबाबत सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच आपत्कालीन प्रतिसाद कार्यपद्धती (एसओपी) अद्ययावत करून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनीही यावेळी अनुषंगिक सूचना केल्या. आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व तहसील कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांना विविध साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सर्व साहित्याची सद्यस्थिती तपासून आवश्यक कार्यवाही करावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी यावेळी सांगितले. महसूल विभाग, जलसंधारण व पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, शिक्षण विभाग आदी विभागांनी मॉन्सूनपूर्व काळात करावयाच्या कार्यवाहीबाबत यावेळी सूचना दिल्या. सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांनी केले. तसेच यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे श्रीराम वाघमारे, अफरोज शेख, प्रतीक देशमुख, लक्ष्मण सादले, भारत पुंडे उपस्थित होते.

## 'बंगालमधील सर्वात लांब किनारपट्टी आमची' ; जयशंकर यांनी थायलंडमध्ये मोहम्मद युनूसला दाखवला आरसा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर सध्या बिमस्टेकमध्ये सहभागी होण्यासाठी थायलंडमध्ये आहेत. यादरम्यान, जयशंकर यांनी राजधानी बँकॉकमध्ये बांगलादेश सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या ईशान्येकडील भागांना भारताशी जोडणाऱ्या आणि या प्रदेशाच्या समुद्राचा स्वतः ला एकमेव संरक्षक म्हणणाऱ्या 'चिकन नेक' विधानावर केलेल्या विधानाला योग्य उत्तर दिले. जयशंकर यांनी बांगलादेशचे मोहम्मद युनूस यांना आरसा दाखवताना सांगितले की, बहु-क्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यासाठी बिमस्टेकबाबत भारताला त्याच्या जबाबदारीची जाणीव आहे. बंगालच्या उपसागराला भारतातील सर्वात लांब किनारपट्टी देखील आहे, जी अंदाजे ६,५०० किलोमीटर पसरलेली आहे.

## चक्रवर्ती सम्राट अशोक यांची ५ एप्रिल रोजी जयंतीचे आयोजन

उदगीर/ प्रतिनिधी अखंड भारताचे महान योध्दा सम्राट अशोक यांची जयंती दि. ५ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघणार आहे. ही जयंती रॅली शहरातील मुख्य मार्गावरून निघून विश्वशांती बुध्दविहार येथे सांगता होणार आहे. चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी मोठ्याप्रमाणात प्रमाणात बोध्द साम्राज्य उभे केला. त्यांनी बोध्दधम्म जगाच्या कानाकोपऱ्यात जिवंत ठेवण्यासाठी शिलालेख, लेणी, विहार व बोध्द विद्यापीठ निर्माण केले. त्याच्या या महान कार्यामुळे बुध्द चिरकाल या पृथ्वी तलावर स्थिरावले. त्यांनी जयंती दि.५ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथून सकाळी १० वाजता निघणार असून शहरातील मुख्यरस्ता मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक परत शहर पोलिस स्टेशन मार्गे चौबारा-सराफलाईन येथून विश्वशांती बोध्द विहार येथे समारोप होणार आहे. या जयंती रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ७ एप्रिल रोजी आयोजन

लातूर :- प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार एप्रिल महिन्यातील लोकशाही दिन सोमवार, ७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

# श्रीमती शांताबाई शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शाळेत वाय-फाय सुविधा व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

रेणापूर /प्रतिनिधी :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बिटरगाव येथे दिवंगत शांताबाई दासू शिंदे यांच्या स्मरणार्थ प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांनी वायफाय सुविधा आणि सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पॅड,पेन आणि ग्रंथ भेट दिले. डॉ.संजय शिंदे हे दरवर्षी आपल्या आई, वडिलांचा स्मृतिदिन शाळेतल्या गरीब विद्यार्थ्यांना विविध शालेय साहित्य भेट देऊन साजरा करतात,आपल्या गावातील बालपणीच्या आठवणी तसेच शिक्षणासाठी केलेला संघर्ष सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात

दिनांक २९ मार्च रोजी प्राचार्य शिंदे यांनी शाळेमध्ये त्यांच्या मातोश्री कै. शांताबाई दासू शिंदे यांच्या स्मृतिदिनी एकवर्षाचे वायफाय(रू.१२०००/) रिचार्ज करून दिले तसेच सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लागणारा पॅड ,पेन आणि ग्रंथ इ.शैक्षणिक साहित्यांची मदत केली.

प्रथमतः कै.शांताबाई शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी झांज वाजवून अभिवादन केले यांच कार्यक्रमात तालुका व जिल्हा स्तरावर प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरलेला विद्यार्थी चि.विराज बालाजी भुतकर यास मुख्याध्यापक श्रीमती कल्पना कटके यांच्याकडून रू.१००१/ रोख व सन्मान चिन्ह देऊन पालकासह सत्कार करण्यात आला. यानंतर कुमारी गौरी पाटील हिने प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांचा जिल्हा परिषद शाळा ते वसंतराव नाईक





महाविद्यालयाचे, प्राचार्य इथपर्यंतचा प्रवास कसा झाला याबद्दल मुलाखत घेतली.त्यांनी बिटरगावची बिकट वाट तुडवत जातांना अनेकांनी मदत केली, अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागले परंतु फुले -शाहू-आंबेडकर या महापुरुषांच्या विचाराने भारावून गेलो होतो म्हणून औरंगाबाद पर्यंत मला जाता आलं सरांनीही या मुलाखतीत समर्पक अशी उत्तरे देऊन विद्यार्थ्यांना प्रेरीत केले

या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोपाळ आलापूरे,माजी शिक्षक नरसिंग घोडके, श्री.अंगद पवळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी अंगद पवळे, नरसिंग घोडके यांनीही मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना कटके ह्या होत्या त्यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी कष्ट करून पुढे गेले पाहिजे असे विचार व्यक्त केले सूत्रसंचालन श्री प्रमोद कटके यांनी केले. प्राचार्य डॉ.संजय शिंदे सरांचा परिचय श्री.मनोजकुमार पांचाळ यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती केदाबाई वनिस , शोभा कांबळे , माणिक पवार दीपक क्षीरसागर , साईनाथ तोटावाड यांनी मेहनत घेतली. मुख्याध्यापक श्रीमती कल्पना कटके यांनी सर्व विद्यार्थ्यांना गुढीपाडव्यानिमित्त साखर गाठी देऊन शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे आभार केदाबाई वणिस यांनी मानले

# विलास सहकारी साखर कारखाना निवडणुक २१ संचालकांची बिनविरोध निवड



लातूर / प्रतिनिधी :- विलास सहकारी साखर कारखान्याच्या २१ जागांसाठी झालेल्या पाचव्या पंचवार्षिक निवडणुकीत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील विलासराव देशमुख सहकार पॅनलचे सर्व अर्ज छानणीनंतर पात्र ठरले. यामुळे निवडणूक बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी जाहीर केले आहे. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या युवा नेतृत्वात स्थापन झालेल्या विलास साखर कारखान्याने मागच्या २५ वर्षात उत्कृष्ट कार्य व व्यवस्थापनाची अनेक उच्चांक प्रस्तापीत करुन साखर कारखानदारी क्षेत्रात आदर्श निर्माण केला. या माध्यमातून लातूर तालुका व जिल्हयात आर्थिक क्रांती घडवली आहे. ग्रामीण जीवनमान उंचावले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, विदयमान चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, माजी आमदार धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मावळत्या संचालक मंडळाने अत्यंत उत्कृष्टरीत्या काम करून ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, शेतमजूर यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अत्यंत उत्तम काम केले आहे. मांजरा परीवारात स्थापन झालेला आणि अत्यंत कडकशीस्तीच्या वातावरणात वाटचाल करीत असलेला विलास सहकारी साखर कारखान्याने एकुण २४ गळीत हंगामात ३६ पेक्षा अधिक राज्य आणि देशपातळीवरील पुरस्कार आणि पारीतोषीके मिळवली आहेत. नेहमीच आधुनीक तंत्रज्ञान आणि प्रयोगशीलतेचा अवलंब करीत उस उत्पादकांना अधिकात अधिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न या कारखान्याच्या माध्यमातून झालेला आहे. संचालक मंडळाने फक्त विश्वस्थाची भुमिका निभावल्यामुळे प्रत्येक सभासद शेतकऱ्यांला हा कारखाना आपल्याच मालकीचा असल्याचा विश्वास वाटतो आहे.

यावेळी कारखान्याची निवडणुक जाहीर झाल्यानंतर नेतृत्वाकडून संचालक मंडळासाठी उमेदवार निवडतांना वेगळा प्रयोगाचा अवलंब केला. यापुर्वीच्या संचालक मंडळातील ५ अनुभवी तर विदयमान संचालक मंडळातील ८ जणांना पून्हा संधी देत नवख्या ८ जणांना उमेदवार म्हणून निवडण्यात आले, परिणामी सर्वसमावेशक संचालक मंडळ निवडल्याचा संदेश कारखाना सभासदामध्ये गेला आहे. कारखान्याचे विश्वस्त चांगले निवडल्याची चर्चा होवून सर्वांनी या पॅनलला एकमुखी पाठींबा देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल होण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत २१ जागेसाठी फक्त २३ उमेदवारी अर्ज दाखल झाले. सोमवार दि. १७ मार्च रोजी अर्जाची छानणी झाली. १८ मार्च रोजी निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहीनी नऱ्हे यांनी २१ पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली. हे सर्व पात्र उमेदवार विलासराव देशमुख सहकार पॅनलचे असल्याने या पॅनलने सदरील निवडणुक जिंकली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २०१४ नियम ३२ अन्वये झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे यांनी काम पाहीले. सदरील निववडणूक बिनविरोध झाली असल्याचे दि. २ एप्रिल रोजी जाहीर केले आहे.

या निवडणुकीत विलासराव देशमुख सहकार पॅनलमधून बिनविरोध निवडूण आलेल्या संचालक मंडळात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख (उत्पादक सहकारी संस्था, बिगर उत्पादक संस्था व पणन संस्था मतदारसंघ), विदयमान चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, लताबाई रमेश देशमुख (महीला प्रतिनीधी), रविंद्र व्यंकटराव काळे, नरसिंग दगडू बुलबुले, रसुल दिलदार पटेल (उसउत्पादक मतदारसंघ निवळी (वैशालीनगर) तात्यासाहेब छत्तू पालकर, रंजीत राजेसाहेब पाटील, गोवर्धन मोहनराव मोरे (गट शिराळा गट), वैजनाथराव ग्यानदेवराव शिंदे, आनंत व्यंकटराव बारबोले, हणमंत नागनाथराव पवार, नेताजी शिवाजीराव साळुंके (देशमुख), नितीन भाऊसाहेब पाटील, रामराव विश्वनाथ साळुंके, (कासारजवळा गट) अमित विलासराव देशमुख, अमृत हरिश्चंद्र जाधव, सतिष विठ्ठलराव शिंदे (पाटील), (विलासनगर (चिंचोलीराववाडी गट), दिपक अर्जुन बनसोडे, (बाभळगाव गट) अनुसुचीत जाती प्रतिनीधी), बरुरे शाम (इतर मागसवर्गीय प्रतिनीधी), भारत माने सुभाष खंडेराव भटक्या विमुक्त जाती व जमाती विशेष मागास प्रवर्ग) यांचा समावेश आहे.

## 'हा' आहे, विविध प्रकारच्या गाठींवरचा रामबाण उपाय; तर बाळंतिणींसाठी




औषधाविना उपचार- सुकामेवा हे बहुतेकदा श्रीमंती खाणे समजले जाते. आर्थिकदृष्ट्या तर ते आहेच पण पोषक तत्त्वे आणि आरोग्याच्या दृष्टीनेही सुकामेव्यातील अनेक घटक श्रीमंत आहेत. म्हणूनच सुकामेवा खाणं गरजेचं आहे. अक्रोड अक्रोड आपल्या वापरात नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अक्रोडाची रचना व आपल्या मेंदूची रचना यात बराच सारखेपणा आहे. डोक्याच्या कवटीत जशी मज्जा असते तसेच अक्रोडच्या टरफलात मेंदूच्या स्वास्थ्याकरिता निसर्गाने अप्रतिम मगज बनविला आहे. ज्यांना बौद्धिक थकवा आहे, मेंदूचे काम जास्त आहे, मगजमारी किंवा डोकेफोड जास्त आहे, विचार-चिंतन फार आहे, त्यांनी अक्रोड नियमितपणे दोन-तीन खावे. ज्यांना झोप येत नाही त्यांनी झोपताना अक्रोडच्या तेलाचा मसाज डोक्याला करावा, उत्तम झोप लागते.

वजन वाढविण्यासाठी अक्रोड उत्तम अक्रोडचे बरेचसे गुण बदामासारखे आहेत. अक्रोड जास्त शुक्रकर आहे. अक्रोड कफपित्तवर्धक, वीर्यवर्धक, बल्य आहे. हृद्रोग, रक्तदोष, वातरक्त यावर उपयुक्त आहे. अक्रोड जास्त प्रमाणात घेतले तर शरीराचा दाह होतो. रेच होतात. वजन वाढविण्याकरिता अक्रोड चांगले. धातू क्षयामुळे उद्भवलेल्या वातविकारात, आमवातात अक्रोड पथ्यकर आहे. अक्रोड कामवासना वाढविणारा आहे. अक्रोडात प्रोटिन व स्निग्ध पदार्थ जास्त आहेत.

# शरीरावर वाढलेला चरबीचा घेर कमी करण्यासाठी 'या' पद्धतीने करा लवंगचे सेवन, कायम दिसाल फिट आणि स्लिम

सतत आहारात होणारे बदल, कामाचा वाढलेला ताण, शारीरिक हालचालींचा अभाव, शरीरात होणारे हार्मोनल बदल इत्यादी अनेक कारणांमुळे महिलांसह पुरुषांचे सुद्धा वजन वाढू लागते. वाढलेले वजन आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. वजन वाढल्यानंतर अनेक लोक दुर्लक्ष करतात. मात्र हळूहळू प्रमाणापेक्षा जास्त वजन वाढल्यानंतर बसताना किंवा वर उठताना अनेक समस्या उद्भवू लागतात. आरोग्यासंबंधित कोणत्याही समस्या उद्भवू लागल्यानंतर सुरुवातीच्या दिवसांमध्ये त्याकडे दुर्लक्ष केले जाते. वजन कमी करण्यासाठी अनेक लोक जिममध्ये जाऊन तासनतास व्यायाम करणे, आहारात वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. मात्र तरीसुद्धा शरीराचे वजन कमी होत नाही. जगभरात वाढलेल्या वजनाने अनेक लोक त्रस्त आहे.





वजन कमी करण्यासाठी अनेक महिला प्रोटीनशेकचे सेवन करतात. मात्र वारंवार प्रोटीनशेकचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. यामुळे किडनी निकामी होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे बाजारात उपलब्ध असलेल्या कोणत्याही प्रोटीनशेकचे सेवन करू नये. आज आम्ही तुम्हाला वजन कमी करताना लवंगचे सेवन कसे करावे? यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

स्वयंपाक घरात अनेक वेगवेगळे मसाले उपलब्ध असतात. त्यामुळे लवंग हा मसाल्यातील प्रकार मोठ्या प्रमाणात वापरला जातो. आयुर्वेदामध्ये लवंग खाण्याचे अनेक फायदे सांगण्यात आले आहेत. यामध्ये असलेले गुणधर्म पोटावर वाढलेला चरबीचा घेर कमी करण्यासाठी मदत करतात. यामुळे शरीराचे चयापचय सुधारते. लवंगमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकतात आणि शरीराला योग्य पोषण देतात.

वजन कमी करण्यासाठी 'या' पद्धतीने करा लवंगचे सेवन:

वाढलेले वजन कमी करण्यासाठी तुम्ही सकाळी उठल्यानंतर लवंगच्या चहाचे सेवन करू शकता. या चहाचे सेवन केल्यामुळे शरीरात साचून राहिलेली विषारी घाण बाहेर पडून जाते, ज्यामुळे वजन कमी होण्यासोबतच शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात. लवंगचा चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम,टोपात पाणी गरम करून त्यात लवंग टाकून उकळवून घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर पाणी गाळून त्यात मध आणि लिंबाचा रस टाकून नियमित सेवन करावे. या पाण्याचे नियमित सेवन केल्यास शरीरावर वाढलेली अतिरिक्त चरबी कमी होऊन जाईल.

लवंग दालचिनीचे पाणी:

मसाल्यांच्या पदार्थांमध्ये लवंग आणि दालचिनीचा वापर भरपूर प्रमाणात केला केला जातो. टोपात पाणी गरम करून त्यात लवंग दालचिनीचे तुकडे टाकून गरम करून घ्या. तयार केलेल्या लिंबू टाकून मिक्स करा. उपाशी पोटी या पाण्याचे नियमित सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे होतील. वाढलेले वजन कमी करण्यासाठी लवंग दालचिनीचे पाणी अतिशय प्रभावी ठरेल.

# स्वामी विवेकानंद शाळेच्या हिंदवी यादव हिची नवोदय विद्यालयासाठी निवड

केज/प्रतिनिधी जीवन विकास शिक्षण मंडळ केज, संचलित स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (मा. वि.) या शाळेची विद्यार्थीनी हिंदवी विष्णू यादव हिची नववी च्या वर्गासाठी नवोदय विद्यालय गढी येथे निवड झाली आहे. त्या बद्दल संस्थेच्या वतीने तिचा पालकासह सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शैलाताई इंगळे अध्यक्षा- शालेय व्यवस्थापन समिती तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब तिडके हे उपस्थित होते. तसेच याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे व पालक विष्णू यादव सर तसेच प्रियंका यादव ( मुळीक ) मॅडम हे ही उपस्थित होते. याप्रसंगी हिंदवीचे पालक विष्णू यादव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांच्या शैक्षणिक जीवनातील विविध पैलूंना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शनातील विजयी विद्यार्थ्यांचे विविध पारितोषिक देऊन त्यांचा गुण गौरव सोहळा संपन्न झाला. या प्रदर्शनामध्ये ५ वी ते ७ वी तसेच ८ वी ते १० वी असे दोन गट तयार करण्यात आले होते. व विजयी स्पर्धकांना सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब तिडके यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ विविध पारितोषिके दिली. तसेच ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाईल तेंव्हा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहनही केले. तसेच याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना प्रचंड वाव मिळतो तसेच भविष्यामध्ये करिअर घडविण्यासाठी आपला आत्मविश्वासही वाढतो. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोथकांत समुद्रे यांनी केले. तर आभार कल्याण आदमने यांनी मानले.




# लाल मिरच्यांपासून बनवा वर्षभर टिकणारे आंबट गोड लोणचं, कमीत कमी साहित्यामध्ये झटपट बनेल पदार्थ

लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं लोणचं खायला खूप आवडते. लोणच्याचे सेवन जेवणात केल्यास जेवणात दोन घास जास्त जातात आणि लोणचं सुद्धा चवीला अतिशय सुंदर लागते. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वेगवेगळ्या पदार्थांपासून लोणचं बनवलं जात. कैरीचे लोणचं, लिंबाचे लोणचं, आल्याचे लोणचं, लसूण लोणचं इत्यादी अनेक लोणच्याचे प्रकार बनवले जातात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये लाल मिरच्यांचे लोणचं बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. लाल मिरच्यांचा वापर मसाला बनवण्यासाठी केला जातो. मात्र असे नसून तुम्ही या मिरच्यांचा वापर करून वेगवेगळे पदार्थ बनवू शकता. जेवणात डाळ भात किंवा चपातीसोबत तुम्ही लोणचं खाऊ शकता. लोणचं बनवताना त्या त भरपूर तेलाचा वापर केला जातो. मात्र आम्ही तुम्हाला कमीत कमी तेलात लोणचं कसे बनवावे, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.





साहित्य: लाल मिरच्या मीठ तेल हिंग मोहरीच्या बिया काळीमिरी बडीशेप ओवा आमचूर पावडर हळद लाल तिखट

कृती: लाल मिरच्यांचे लोणचं बनवण्यासाठी सर्वप्रथम, लाल मिरच्या स्वच्छ धुवून पुसून घ्या. त्यानंतर त्यांचे देठ काढून दोन तुकडे करा.

बिया काढून घेतलेल्या मिरच्या ५ ते ६ तास कडक उन्हात व्यवस्थित सुकवून घ्या.


तव्यामध्ये मोहरी, धणे, मेथीचे दाणे, बडीशेप, काळी मिरी आणि लाल मिरची सर्व मसाले वेगवेगळे भाजून घ्या. भाजून थंड केल्यानंतर बारीक पावडर तयार करा.

कढईमध्ये तिळाचे तेल गरम करून त्यात वाटून घेतलेले मसाले, आमचूर पावडर, हिंग, ओवा, कलौंजी, काश्मिरी लाल मिरची पावडर , हळद, मीठ आणि तीळ टाकून व्यवस्थित भाजा. सुकवून घेतलेल्या बियांमध्ये तयार केलेला मसाला भरून तेलात मिरच्या ठेवा. त्यानंतर तयार करून घेतलेले मिरचीचे लोणचं

काचेच्या बरणीमध्ये भरून दोन दिवस उन्हात ठेवा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले लाल मिरच्यांचे लोणचं.

# उन्हामुळे केस कोरडे आणि निस्तेज झाले आहेत? चमकदार केसांसाठी अळशीच्या बियांचा वापर करून बनवा हेअरमास्क, केस गळती होईल कमी

सर्वच महिलांना चमकदार आणि सुंदर केस हवे असतात. केसांच्या वाढीसाठी महिला सतत काहींना काही करत असतात. मात्र तरीसुद्धा केसांच्या वाढीमध्ये कोणताच बदल दिसू येत नाही. उन्हाळ्यात त्वचेसह केस सुद्धा अधिक कोरडे आणि निस्तेज होऊन जाते.केस निस्तेज झाल्यानंतर कोणतीही हेअर स्टाईल केली तरी केस सुंदर दिसत नाहीत. त्यामुळे केसांच्या वाढीकडे योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. अनेक महिला केस चमकदार आणि सुंदर करण्यासाठी वेगवेगळ्या हेअर ट्रीटमेंट, हेअर मास्क, हेअर केअर प्रॉडक्ट इत्यादी अनेक गोष्टींचा वापर केला जातो. मात्र तरीसुद्धा केसांमध्ये कोणताच फरक दिसून येत नाही. केसांच्या निरोगी वाढीसाठी केसांना आतून वरून पोषण देण्याऐवजी आतून पोषण देणेसुद्धा तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे आहारात बदल करून पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे.





उन्हाळ्यात केस कोरडे झाल्यानंतर केसांना पोषण देणे आवश्यक आहे. यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या केमिकल प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करावा. केसांच्या वाढीसाठी अळशीच्या बिया अतिशय प्रभावी ठरतात. त्यामुळे रोजच्या आहारात तुम्ही अळशीच्या बियांचे सेवन देखील करू शकता. आज आम्ही तुम्हाला अळशीच्या बियांचा वापर करून हेअर मास्क कसा तयार करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. अळशीच्या बियांचा वापर त्वचा आणि केसांसाठी केल्यास केस मऊ आणि सुंदर दिसतील. मऊ आणि चमकदार केसांसाठी 'या' पद्धतीने बनवा अळशीच्या बियांचा हेअरमास्क: केसांच्या वाढीसाठी केमिकल प्रॉडक्ट किंवा वेगवेगळ्या ट्रीटमेंट करून घेण्याऐवजी घरगुती उपाय करावे. घरगुती उपाय केल्यास केस मऊ आणि चमकदार दिसतील. अळशीच्या बियांचा वापर केल्यामुळे केस मऊ आणि स्मूथ होतात. हेअरमास्क तयार करण्यासाठी टोपात पाणी गरम करून त्यात अळशीच्या बिया आणि तांदळाचे पीठ टाकून मिक्स करा. तयार केलेले मिश्रण वाफल्यानंतर गॅस बंद करून हेअरमास्क थंड करून घ्या.

उन्हामुळे केस कोरडे आणि निस्तेज झाले आहेत? चमकदार केसांसाठी अळशीच्या बियांचा वापर करून बनवा हेअरमास्क, केस गळती होईल कमी तयार करून घेतलेले हेअर मास्क केसांवर लावण्यासाठी सर्वप्रथम केस व्यवस्थित विंचरून घ्या. त्यानंतर केसांच्या मुळांपासून ते टोकांपर्यंत सगळीकडे तयार केलेला हेअरमास्क लावून घ्या. ३० मिनिट हेअरमास्क लावून नंतर शँम्पूच्या सहाय्याने केस स्वच्छ करून घ्या. यामुळे केसांची मूळ मजबूत होतील आणि केस सुंदर लागतील. अळशीच्या बियांचे फायदे: अळशीच्या बियांचे सेवन केल्यास केसांसह त्वचेलासुद्धा अनेक फायदे होतात. याशिवाय यात फायबर, विटामिन बी कॉम्पलेक्स, प्रोटिन, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फोरस, थायामिन इत्यादी अनेक घटक आढळून येतात. यामध्ये असलेले नैसर्गिक घटक केसांना पोषण देतात. त्यामुळे अळशीच्या बियांचे नियमित सेवन करावे.

# मांजरा साखर परिवारातील मांजरा, रेणा, विलास साखर कारखान्याचे पंचवार्षिक संचालक मंडळ बिनविरोध

## राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखानदा रीत मांजरा परिवाराचा बिनविरोध निवडीचा नवा पॅटर्न

लातूर / प्रतिनिधी :- राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या लातूर जिल्ह्यातील मांजरा साखर परिवारातील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना, रेणा साखर कारखाना, विलास साखर कारखान्याच्या २०२५- २०३० या पंचवार्षिक निवडणुकीत सर्व संचालक मंडळ बिनविरोध निवडून आले असून राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या परिवारातील तीनही सहकारी साखर कारखान्याची निवडणूक पार पडली आहे राज्यातील सहकार क्षेत्रात सलग २५ वर्षात बिनविरोध निवडून येणारे मांजरा साखर परिवारातील साखर कारखाने पहिले ठरलेले असून राज्याच्या सहकार क्षेत्रात या बिनविरोध निवडीमुळे मांजरा साखर परिवाराचा नवा पॅटर्न निर्माण झाला आहे बिनविरोध निवड अन् सभासदांचा परिवारावर विश्वास

राज्यात अनेक जिल्ह्यात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्याची निवडणुक असो की सर्वसाधारण सभा असो की तिथं पोलिस बंदोबस्त तैनात केलेला असतो इथ लातूर जिल्ह्यातील परीस्थिती वेगळी आहे आपल्या जिल्ह्यात सर्वसाधारण सभा म्हटले की लोक स्वतः सभेला येतात अगदी एखाद्या आपल्या घरचां कार्यक्रम असल्यासारखे येतात अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात आपल्याकडे सभा बैठका पार पडतात वेगळा आनंद घेतात हे आपल नात परिवाराने टिकवले आहे राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी ज्या पद्धतीने मांजरा साखर उद्योग उभे केले तो शेतकरी केंद्रबिंदू मानून कार्य केले अजूनही त्याच पद्धतीने राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख, जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सहकारी साखर कारखानदारी अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करीत या भागातील आर्थिक सुबत्ता देण्याचे काम या मांजरा साखर परिवारातील साखर कारखान्यानी केलेले आहे हे सगळ आपण उघड डोळ्याने पाहतोय त्यामुळें या कारखानदारीत राजकीय हस्तक्षेप राजकारण केलं नाही समाजाचे भल कस होईल व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कसे करता येईल याचा जास्त विचार संचालक मंडळ करीत असताना कारखाने चांगले व नफ्यात चालले पाहिजे याकडेही परिवाराचे लक्ष असते त्यामुळें गेल्या २५वर्षात पंचवार्षिक निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत सहकार क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे राज्यात नावलौकिक म्हणुन मांजरा परिवाराची ओळख राहिलेली आहे त्यामुळे राजकीय विरोधक सुधा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या साखर कारखान्याच्या निवडणुकीत फॉर्म सुधा भरत नाहीत हे विशेष आहे कारण हे साखर उद्योग नुसते कारखाने नाहीत तर शेतकऱ्यांचे मंदिर झालेले आहेत हे सर्व ग्रामीण भागातील उस उत्पादक शेतकऱ्यांना मतदारांना चांगल माहीत आहेत त्यामुळें परिवारातील मांजरा,रेणा, विलास साखर कारखान्याचे पंचवार्षिक निवडणुकीत लोकनेते विलासराव देशमुख सहकार





विकास पॅनलचे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत विरोधकांचा तीनही साखर कारखान्यात एकही नामनिर्देशन फॉर्म राहिला नाही हे मांजरा साखर परिवारावर असलेल्या लोकांकडून विश्वासाची कार्याची पावती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही लोकांच्या विश्वासाला मांजरा परिवार पात्र जिल्ह्यात मांजरा साखर परिवाराचे मांजरा, रेणा, विलास, विलास २, मारुती, जागृती ट्वेंटी वन असे तर जिल्ह्याबाहेर परभणी नांदेड,धाराशिव जिल्ह्यात ३ साखर उद्योग आहेत असे एकूण १० साखर कारखाने आहेत सगळीकडे उसाला एकच भाव देणारा हा परिवार आहे या साखर कारखानदारी मुळे जिल्ह्यात आर्थिक सुबत्ता मिळत आहे शेतकरी शेतमजूर तरुणांना रोजगार मिळाला आहे त्यामुळें उस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम या परिवाराने केले आहे त्यामुळे लोकांना निवडणूक व्हावी यात रस नाही चांगल करत आहेत उसाला योग्य भाव मिळत आहेत उस उत्पादक शेतकऱ्यांना उसासाठी कोणाच्या मागे लागायची गरज नाही नियमाने उसाचे गाळप होत आहे त्यामुळे उस उत्पादक सभासदांनी पुन्हा संचालक मंडळ बिनविरोध निवड व्हावी याकडेच जास्त लक्ष वेधून घेतलेले दिसत आहे राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख, जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बिनविरोध निवडीची परंपरा परिवारातील साखर कारखान्याच्या सभासदांनी राखली आहे

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना नूतन संचालक मंडळ बिनविरोध २१ जागेसाठी २१ उमेदवार राहिल्याने लोकनेते विलासराव देशमुख सहकार विकास पॅनलचे सर्वच उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत निवडून आलेल्या उमेदवारांत माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार अमित विलासराव देशमुख, मदन भिसे, नवनाथ काळे, अशोक काळे, वसंत उफाडे ,कैलास पाटील, धनराज दाताळ, तात्यासाहेब देशमुख, ज्ञानेश्वर पवार, कदम भैरू, श्रीशैल्य उटगे, सदाशिव कदम नीलकंठ बचाटे सचिन शिंदे दयानंद बिडवे, निर्मला चामले , छायाबाई कापरे, शंकर बोळंगे, अनिल दरकसे, बाळासाहेब पांढरे यांचा समावेश आहे

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक-शिक्षक संवाद महत्त्वाचा - पृथ्वीराज पाटील एकंबेकर

उदगीर/ प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कार्यशाळा नोकरीची संधी, तज्ञांचे मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक शिक्षक संवाद महत्त्वाचा आहे असे प्रतिपादन युवा नेतृत्व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील एकंबेकर यांनी विद्यावर्धिनी हायस्कूल येथे संपन्न झालेल्या पालक मेळावा कार्यक्रमास प्रसंगी आपले विचार व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रत्येक पालकांच्या आपल्या मुला मुलीकडून काही स्वप्न असतात ते स्वप्नपूर्तीसाठी शाळा ,शिक्षक, पालक काही जबाबदारी असते आज पालक आपल्या पाल्यास खूप काळजी घेतो परंतु त्याची मित्र संगती खूप महत्त्वाची आहे. याकडे आपण विशेष लक्ष ठेवले पाहिजे. विद्या वर्धिनी शाळा म्हणजे ज्ञान- विज्ञान -संस्कार देणारी सुसंस्कृत नागरिक घडविण्यासाठी धडपड असणारी शाळा आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक शारीरिक बौद्धिक सामाजिक विकास घडविण्याचे अविरतकार्य या शाळेत होत असते या पालक मेळाव्यातून अनेक विचारांची देवाण-घेवाण




होऊन अनेक समस्यांचे निराकरण केले जाते म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक शिक्षक संवाद महत्त्वाचा आहे. या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आढावा व संस्थेची कार्याची माहिती किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष गुंडेराव पाटील यांनी या पालक मेळाव्यात इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शवून आपले मनोगत व्यक्त केले.शाळेच्या प्रगती बद्दल प्लेसमेंट व विद्यार्थ्यांच्या प्रगती बद्दल अभिनंदन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी उपस्थित सर्व पालकांचे गुलाबाचे पुष्पदन स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी.टी शिंदे,कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक राम ढगे, किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यालयीन प्रमुख डी.पी सूर्यवंशी, उप मुख्याध्यापक बी.बी नागरवाड, पालक सदस्य धनराज पाटील, पर्यवेक्षक राजेंद्रकुमार वलाकटे यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, शिक्षक कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती. या क्रमांकाचे प्रास्ताविक बी.बी नागरवाड यांनी केले. सूत्रसंचालन जमील अत्तार तर आभार बंडू पाटील लोणीकर यांनी मांनले.

# वकील संघाच्या अध्यक्षपदी किशोर मुनेश्वर, सचिवपदी माज बडगुजर,तर कोषाध्यक्षपदी सम्राट सर्पे



किनवट/ शेख शौकत :- किनवट न्यायालय वकील संघाच्या काल(ता.२) झालेल्या बहुरंगी निवडणुकीत अध्यक्षपदी किशोर मुनेश्वर, सचिवपदी माज बडगुजर हे विजयी झालेत,तर कोषाध्यक्षपदी सम्राट सर्पे यांची बिनविरोध निवड झाली.अन्य पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी टेकसिंग चव्हाण व सहसचिवपदी सुरेश मुसळे हे विजयी झालेत.ग्रंथपालपदी विशाल कानिंदे यांची निवड करण्यात आली.विजयी उमेदवारांचा निवडणूक निर्णय अधिकारी ड.शंकर राठोड व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ड.सुनिल येरेकार यांनी विजयी प्रमाणपत्र देऊन व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.ही कार्यकारिणी दोन वर्षे कार्यरत राहील.

# बेवारस वाहने घेऊन जाण्याचे लातूर पोलिसांचे आवाहन.

लातूर :- अनेक महिन्यापासून विविध गुन्ह्यांत जप्त व बेवारस दुचाकी आणि चारचाकी वाहने लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या आवारात लावण्यात आलेली आहेत. सदर वाहने मूळ मालकास परत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. येत्या १५ दिवसांत ही कार्यवाही करण्यात येणार असून नागरिकांनी आपली वाहने घेऊन जावीत असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

चाकुर, कासारशिरशी, उदगीर शहर, उदगीर ग्रामीण, वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर. मुरुड, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या आवारात गेल्या अनेक महिन्यापासून विविध गुन्ह्यांतील बेवारस वाहने पडून असून दुचाकी व चारचाकी वाहनांचे चेसीस क्रंमाक व इंजीन क्रमांक याची तपासणी करून वाहन मूळ मालकाला परत देण्यात येणार आहे. वाहनाच्या मालकांनी स्वतः वाहनाचे कागदपत्रासह उपस्थित राहून येत्या १५ दिवसांच्या आत योग्य ती कायदेशीर बाबींची पूर्तता करून वाहन घेऊन जावे, उर्वरित वाहना बद्दल कोणाचीही मालकी सिद्ध नाही झाल्यास कुणाचीही तक्रार नाही असे गृहीत धरून पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ८७ व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५८ प्रमाणे बेवारस वाहनांची जाहीर लिलाव प्रकिया राबविण्यात येणार आहे.

सदर वाहना संदर्भातील वाहन क्रमांक व चेसीज, इंजिन क्रमांकाची माहिती लातूर पोलीस दलाच्या वेबसाईट वर प्रसारित करण्यात आली असून संबंधित पोलीस ठाण्याच्या नोटीस बोर्डवर वाहनाच्या माहितीची लिस्ट लावण्यात आलेली आहे.

# मेघना कावली यांनी किनवट पंचायत समितीला भेट पाणीटंचाईच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश

किनवट: शेख शौकत :-किनवट तालुका पंचायत समितीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी किनवट पंचायत समितीला भेट देऊन पाणीटंचाई व रखडलेल्या ९९२ घरकुलांच्या कामांचा आढावा घेतला. उन्हाळ्यात गाव पातळीवर पाणीटंचाईची समस्या उद्भवू नये, यासाठी संभाव्य किनवट पंचायत समितीचे पाणीटंचाई कृती आराखड्यातील कामे मार्गी लावा, अशा सूचना कावली यांनी दिल्या. किनवट पंचायत समितीच्या सभागृहात ग्रामपंचायत अधिकारी व सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, बीडीओ सुरेश कांबळे, सहा. गटविकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव यांची उपस्थिती होती. मेघना कावली यांनी पाणीटंचाई हा प्रश्न सोडवण्यास प्राधान्य द्या, आराखड्याप्रमाणे कामे करा, विहीर, बोअर अधिग्रहण करण्यापूर्वी स्थळ पाहणी करूनच प्रस्ताव सादर करा. तालुक्यातील २२ विहिरींतील गाळ काढायचा आहे. लवकर गाळ काढण्याचे अंदाजपत्रक सादर करण्याच्या सूचना उपअभियंता यांना दिल्या. त्याचप्रमाणे रखडलेल्या सर्व घरकुलांची कामे हाती घेऊन मार्गी लावा. ज्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या त्रुटी असतील. त्या दूर करण्यासाठी प्रत्यक्ष लाभार्थ्यांशी संपर्क करा व घरकुलाची रखडलेली कामे पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या आणि किनवट तालुक्यातील सामान्य नागरिकाच्या कामे करून लोकांचा विश्वास जिंका मेघना कावली.



यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के. पी. गायकवाड, बालविकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठकरोड, गटशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, कृषी अधिकारी पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी वसंत वाघमारे, कैलास गायकवाड, जीवन कांबळे आदींची उपस्थिती होती.

# केज तालुक्यात विज पडून एका शेतकऱ्या सह गाईचा मृत्यू



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील आडस-केकानवाडी परिसरामध्ये अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसात वीज कोसळून शेतकऱ्यासह गायीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. देवीदास शहाजी केकाण वय ६५ वर्षे रा. केकाणवाडी असे वीज कोसळून मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, ते दुपारी आसरडोह रस्त्याकडील नवरुका शिवारात जनावरे चारीत होते. यावेळी अचानक पाऊस आल्याने ते लिंबाच्या झाडाखाली उभे होते. यावेळी या झाडावर वीज कोसळून शेतकरी देवीदास केकाण जागीच ठार झाले तर एक गाय ही दगावली आहे. वेधशाळेने गारपीट व वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. या अंदाजा प्रमाणे दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील आडस परिसरात सुसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या घटनेची माहिती तालुका प्रशासन आणि आडस पोलीस चौकीला देण्यात आली आहे.

# जागतिक ऑटिझम दिन उत्साहात साजरा - दिव्यांग मुलांसोबत संवाद साधत त्यांच्या अडचणींवर उपाय

लातूर :- २ एप्रिल २०२५ उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटीझम अॅन्ड मल्टी डिसेबिलिटी रिसर्च सेंटर येथे जागतिक ऑटिझम दिन उत्साहात आणि संवेदनशीलतेने साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे आणि जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमाने ऑटिझमबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्यास मदत केली. या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उमंग येथे उपस्थित दिव्यांग मुले आणि त्यांच्या पालकांशी मनमोकळा संवाद साधला. पालकांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि उमंगमध्ये दिल्या जाणाऱ्या विविध थेरेपींच्या प्रभावाबद्दल चर्चा केली. यावेळी पालकांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात आल्या. या मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक विकासासाठी प्रशासनाच्या वतीने विविध






उपक्रम राबवले जातील, असेही यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी उमंग ऑटिझम सेंटरचे प्रकल्प संचालक किरण उटगे, उमंग व्यवस्थापक अॅड. श्रीहरी गोरे, डॉक्टर श्रीशैलम तलारी, डॉक्टर वैभव उटगे, गणेश डोंगरे, डॉक्टर मंदिरा भोसले, डॉक्टर अर्जुन राठोड, तसेच उमंगचे कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अपर्णा बेंबळगे यांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने पार पाडले. या उपक्रमाद्वारे समाजात ऑटिझम विषयी जागृती निर्माण होण्यास आणि दिव्यांग मुलांना अधिक चांगले वातावरण उपलब्ध होण्यासाठी मोलाची मदत होणार आहे. तसेच प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे भविष्यात अशा मुलांसाठी अधिक सुविधा आणि मदत उपलब्ध करून देण्यात येईल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE